नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

| वर्ष - ३ रे<br>Year - 3rd | अंक - १४०<br>Issue - 140 | वार बुधवार दि. ८ ऑक्टोबर २०२५<br>Blow- Wednesday Date 8 October 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com<br>वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४<br>Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये<br>Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026<br>ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |
|---|---|---|---|---|---|---|



# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ३१ हजार ६२८ कोटींचे पॅकेज

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; दिवाळीपूर्वी देण्याचा प्रयत्न राहणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतीचे मोठे नुकसान झाले. यामध्ये २९ जिल्हे प्रभावित झाले आहेत. या जिल्ह्यांतील नुकसानग्रस्त २५३ तालुके आणि २०५९ मंडळांमध्ये मदतीसाठी ६५ मिलीमिटर पावसाची अट न ठेवता शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई देण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. नुकसानग्रस्त भागातील बळीराजाला पुन्हा उभे करण्यासाठी ३१ हजार ६२८ कोटींच्या मदतीचे पॅकेज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज जाहीर केले. या पॅकेजनुसार कोरडवाहू शेतीसाठी प्रति हेक्टरी १८ हजार ५०० रुपये, हंगामी बागायतीसाठी २७ हजार रुपये तर बागायतीसाठी प्रति हेक्टरी ३२ हजार ५०० रुपये मदत दिली जाणार आहे. जाहीर करण्यात आलेली मदत दिवाळीपूर्वी देण्याचा प्रयत्न राहणार असून ही आतापर्यंतची सर्वात मोठी आर्थिक मदत असल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी शेतकऱ्यांसाठी देऊ केलेल्या मदतीची माहिती दिली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, मुख्य सचिव राजेशकुमार, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद-सिंगल आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अतिवृष्टीमुळे शेती आणि शेतकऱ्यांसह पिके, जनावरे, गोठे, दुकाने, ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. काही जणांचे मृत्यूही झाले आहेत. मंत्रिमंडळातील सदस्यांनी काही ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करुन नुकसानग्रस्तांना तातडीची १० हजार रुपयांची मदत, गहू, तांदूळ आदी देण्यात आले. यासाठी २२०० कोटी रुपयांचा पहिला हप्ता तातडीने मंजूर करण्यात आला. विमाधारक शेतकऱ्यांना लवकर मदत मिळवून देण्यासाठी केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान स्वत: प्रयत्न करीत असून विमाधारकांव्यतिरिक्त इतर शेतकऱ्यांनाही १७ हजार रुपये प्रति हेक्टरी इतकी रक्कम दिली जाणार आहे. या भरपाईसाठी १८ हजार कोटींहून अधिकची तरतूद केली जाणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यात एक कोटी ४३ लाख ५२ हजार २८१ हेक्टर क्षेत्रावर पीक लागवड झाली. त्यापैकी ६८ लाख ६७ हजार ७५६ हेक्टर क्षेत्रावर अतिवृष्टीमुळे नुकसान झाले आहे. ज्या ठिकाणी घरांचे नुकसान झाले, तिथे नव्याने घरे बांधण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मदत करण्यात येणार आहे, तर डोंगरी भागात घरे बांधण्यासाठी अतिरिक्त १० हजारांची मदत देण्यात येईल. तसेच ज्या दुकानांचे नुकसान झाले असेल त्यांना ५० हजार रुपये, मृत्यूमुखी पडलेल्या जनावरांसाठी तीन जनावरांची अट न ठेवता प्रति जनावर ३७ हजार ५०० रुपये तर १०० रुपये प्रति कोंबडी अशी भरपाई देण्यात येईल. जमीन खरडून गेलेली शेती पुन्हा लागवडीयोग्य होण्यासाठी ४७ हजार रुपये प्रति हेक्टरी थेट मदत तर तीन लाख रुपये मनरेगा मधून दिले जातील. बाधित विहिरींसाठी विशेष बाब म्हणून प्रति विहीर ३० हजार रुपये देण्यात येतील. त्याचप्रमाणे मत्स्यशेती तसेच बोटींच्या नुकसान भरपाईसाठी १०० कोटींची तरतूद केल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, शेतकऱ्यांना मदत देताना ग्रीस्टॅकमधील माहिती ग्राह्य धरली जाईल. त्यासाठी कुठलीही कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही. पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी १० हजार कोटी रुपये, तसेच पूरग्रस्तांसाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतील पाच टक्के निधी राखीव ठेवण्यात आला आहे. या माध्यमातून १५०० कोटी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. या भागात टंचाई परिस्थितीत लागू असलेल्या सर्व सवलती ओली टंचाई समजून लागू करण्यात येणार आहेत. बळीराजा वीज सवलत योजनेमुळे कृषी पंपांना आधीच वीज देयक माफ केले आहे, त्यामुळे वीज देयकाची वसूली होणार नाही.

या अभूतपूर्व संकटात मुख्यमंत्री सहायता निधीसाठी मोठ्या प्रमाणात मदत येत असल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले अनेकांनी सामाजिक उत्तरदायित्व निधी देण्याचेही मान्य केले. जी मदत नियमांमध्ये बसणार नाही अशा प्रकरणी मुख्यमंत्री सहायता निधीमधून देण्यात येईल. पुरामुळे कागदपत्रे, शैक्षणिक साहित्य वाहून गेलेल्या एकाही विद्यार्थ्याचे शिक्षण बाधित होणार नाही, याची दक्षता घेतली जाणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी आवर्जून सांगितले.

### असे आहे पॅकेज

**मृतांच्या कुटुंबीयांना: ४ लाख प्रत्येकी, जखमी व्यक्तींना : ७४ हजार रुपये ते २.५ लाख रुपये, घरगुती भांडे, वस्तूंचे नुकसान: पाच हजार रुपये प्रति कुटुंब, कपडे, वस्तूंचे नुकसान: पाच हजार रुपये प्रतिकुटुंब, दुकानदार, टपरीधारक: ५० हजार रुपये, डोंगरी भागात पडझड, नष्ट पक्क्या घरांना : एक लाख २० हजार रुपये, डोंगरी भागात पडझड, नष्ट कच्च्या घरांना : एक लाख ३० हजार रुपये, अंशत: पडझड: ६,५०० रुपये, झोपड्या: आठ हजार रुपये, जनावरांचे गोठे: तीन हजार रुपये, दुधाळ जनावरे: ३७,५०० रुपये, ओढकाम करणारी जनावरे: ३२ हजार रुपये, कुक्कुटपालन: १०० रुपये प्रति कोंबडी.**

**निकषापेक्षा अधिकची मदत देण्यासाठी १० हजार कोटी रुपये अतिरिक्त, खरडून गेलेल्या जमिनीसाठी ४७ हजार रुपये प्रति हेक्टर थेट मदत आणि मनरेगाअंतर्गत तीन लाख रुपये प्रतिहेक्टर, खचलेली किंवा बाधित विहीर: ३० हजार रुपये प्रति विहीर, तातडीच्या मदतीसाठी १५०० कोटी रुपये जिल्हा नियोजन निधीमध्ये राखीव.**

**संकट काळात बळीराजाच्या मदतीसाठी शासन तत्पर : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

अस्मानी संकटामुळे खचलेल्या शेतकऱ्यांना आधार देण्याचा प्रयत्न शासन करीत आहे. पूरग्रस्त भागात नुकसानीसाठी तातडीची १० हजाराची मदत देण्यात आली आहे. अशा संकट काळात अन्नदाता बळीराजाच्या मदतीसाठी शासन धावून आले आहे. सर्व अटी - शर्ती बाजूला ठेवत शेतकरी हिताला शासनाचे प्राधान्य असून शेतकऱ्यांच्या मदतीसाठी शासन तत्पर आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, राज्यात ६५ लाख हेक्टर जमिनीवर शेतीचे नुकसान **(पान २ वर...)**

## खासगी बसवर दरड कोसळली, अख्खी बस ढिगाऱ्याखाली, १८ जणांचा मृत्यू, बचाव कार्य सुरु

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिमला: हिमाचल प्रदेशच्या बिलासपूरमध्ये भूस्खलन झालं आहे. ढिगाऱ्याखाली एक बस अडकली आहे. दुर्घटनेत आतापर्यंत १८ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. दुर्घटनेची माहिती मिळताच तातडीनं मदत आणि बचत कार्य सुरु करण्यात आलं. स्थानिक प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन विभागानं ढिगारा दूर करुन बसमध्ये अडकलेल्या प्रवाशांची सुटका करण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न रात्रीपर्यंत सुरु होते. बिलासपूरमधील बल्लू पूल परिसरात भूस्खलन झालं. दरड कोसळल्यानं एक बस अडकली. बस ढिगाऱ्याखाली अडकल्याची माहिती मिळताच बचाव कार्य सुरु झालं.




आतापर्यंत १८ जणांचा मृत्यू झाला असून ३ जणांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आलं आहे. बसमध्ये २५ ते ३० प्रवासी असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. स्थानिकांनी मदत आणि बचाव कार्यात प्रशासनाला मदत करण्यास सुरुवात केली आहे. बचाव कार्य रात्रभर सुरु राहील आणि बसमध्ये अडकलेल्या प्रवाशांना लवकरात लवकर सुरक्षित बाहेर काढलं जाईल, असं अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आलं आहे. अपघातस्थळी जेसीबी आणण्यात आले आहेत. त्यांच्या मदतीनं ढिगारा उपसला जात आहे. डोंगरावरुन मोठमोठे दगड कोसळल्यानं बसचा पूर्णपणे चेंदामेंदा झाला आहे.

हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सिंह सुक्खू यांनी अपघाताबद्दल शोक व्यक्त केला आहे. बचाव कार्याला वेग देण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत. त्यांनी मृतांच्या कुटुंबियांबद्दल सहवेदना व्यक्त करत दिवंगत प्रवाशांच्या आत्म्याला शांती लाभावी यासाठी प्रार्थना केली आहे. राज्य सरकार या कठीण प्रसंगात मृत प्रवाशांच्या कुटुंबियांसोबत ठामपणे उभं असून त्यांना आवश्यक असलेली सर्व मदत देण्यात येईल, असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिलं आहे.

## केंद्र सरकारचं महाराष्ट्राला मोठं गिफ्ट; २ रेल्वे प्रकल्प मंजूर, केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मोठा निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : केंद्र सरकारने महाराष्ट्राला मोठं गिफ्ट दिल्याची चर्चा आहे. त्यामागील कारणही अगदी तसंच आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाची आज महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत देशभरात चार रेल्वे प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली. यापैकी दोन रेल्वे प्रकल्प हे महाराष्ट्रातील आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर माध्यमांना प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांनी मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांची माहिती दिली. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत चार रेल्वे प्रकल्प मंजूर झाले. या चारही मर्गांचा अंदाजित खर्च हा २४,६३४ कोटी रुपये इतका आहे. आवश्यक असेल तिथे चार पदरी आणि शक्य असेल तिथे सहा पदरी रेल्वे मार्ग करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती अश्विनी वैष्णव यांनी दिली.



केंद्रीय मंत्रिमंडळात आज महाराष्ट्रातील दोन रेल्वे प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली. यामध्ये वर्धा ते भुसावळ रेल्वे मार्गावर तीन आणि चार लेनचे मल्टिट्रॅक रेल्वे काम मंजूर करण्यात आला. हा मार्ग जवळपास ३१४ किमी अंतराचा आहे. तर दुसरा मार्ग हा महाराष्ट्र आणि छत्तीसगड दरम्यानचा आहे. गोंदिया ते डोंगरगढ अशा मार्गाला मंजुरी देण्यात आली आहे. हा चार लेनचा रेल्वे ट्रॅक प्रकल्प आहे. या प्रकल्पाचं अंतर हे ८४ किमी इतकं आहे. याशिवाय इतरही दोन रेल्वे प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली. यामध्ये बडोदा-तलाम आणि इटारसी-भोपाळ-बीना या रेल्वे प्रकल्पांचा समावेश आहे. या चारही प्रकल्पांमध्ये महाराष्ट्राचा वर्धा-भुसावळ रेल्वे प्रकल्प जास्त अंतराचं आहे.

### मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय

## एसआरएअंतर्गत झोपडपट्टी पुनर्विकासासाठी समूह पुनर्विकास योजना राबविणार

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबईतील क्षेत्रात मोठ्या खासगी, शासकीय, निमशासकीय भुखंडावरील झोपडपट्ट्यांच्या विकासासाठी बृहन्मुंबई झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या माध्यमातून झोपडपट्टी समूह पुनर्विकास योजना राबविण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

मुंबईत झोपड्या व त्याचबरोबर काही जुन्या मोडकळीस आलेल्या इमारती, बांधकामे, भाडेकरू व्याप्त इमारती, बांधकाम अयोग्य मोकळ्या जागा तसेच काही वस्त्या आहेत. अशा क्षेत्राचा पुनर्विकास नगर नियोजनाच्या दृष्टीने एकात्मिक व शाश्वत पध्दतीने व्हावा यासाठी ही समूह पुनर्विकास योजना राबविण्यात येणार आहे. जेणेकरून सर्व नागरी सुविधांचा विकाससुध्दा अत्याधुनिक व शास्त्रीय पध्दतीने करता येऊन, या ठिकाणच्या नागरिकांचे जीवनमान सुकर होईल. त्यासाठी समूह पुनर्विकासाची विशेष योजना आखण्यात आली आहे. या योजनेतील तरतुदी प्रमाणे, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण हे झोपडपट्टी समूह पुनर्विकास योजनेसाठी नोडल एजन्सी असेल.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण किमान ५० एकर सलग (Contiguous) क्षेत्रफळ असलेल्या जमिनीचे समूह निश्चित करेल, ज्यामध्ये ५१ टक्के पेक्षा जास्त झोपडपट्टी क्षेत्राचा समावेश असेल. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई यांनी निर्धारित केलेल्या समूह क्षेत्रास अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात येणाऱ्या उच्चस्तरीय समितीची व त्यानंतर शासन मान्यता देण्यात येईल.

ही पुनर्विकास योजना शासकीय संस्थेला संयुक्त उपक्रम मार्गाने राबविण्यासाठी द्यावी किंवा निविदा प्रक्रियेद्वारे खासगी विकासकाची नेमणूक करावी किंवा एखाद्या विकासकाकडे अशा समूह पुनर्विकास योजनेच्या एकूण क्षेत्रफळापैकी ४० टक्क्यांपेक्षा अधिक क्षेत्र असल्यास, तिथे विकासकामार्फत समूह पुनर्विकास योजना राबविण्याचा निर्णय उच्च स्तरीय समितीच्या शिफारशीनुसार शासनाच्या पूर्व परवानगीने घेण्यात येईल.

केंद्र शासनाच्या तसेच त्यांच्या अधिपत्याखालील उपक्रमांच्या जमिनीच्या बाबतीत, जर केंद्र शासनाने/संबंधित उपक्रमांनी संमती दिली तर ही जमीन झोपडपट्टी समूह पुनर्विकास योजनेत समाविष्ट केली जाईल.

झोपडपट्टी समूह पुनर्विकास योजनेतील काही इमारती विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०३४ मधील विनियम ३३(१०) व्यतिरिक्त इतर तरतुदींनुसार (उदा. ३३(७), ३३(५), ३३(९) किंवा अन्य) विकासास पात्र असतील, तर अशा इमारतींचा समूह पुनर्विकासामध्ये समावेश केल्यास त्यांना ३३(१०) अंतर्गत देण्यात येणारा लाभ किंवा संबंधित तरतुदींनूसार मिळणारा लाभ यांपैकी जो जास्तीचा असेल तो देण्यात येईल.

खासगी जमिनीच्या मालक/मालकांना प्रस्तावित झोपडपट्टी समूह पुनर्विकास योजनेत सामील करण्यासाठी उच्च स्तरीय समितीच्या पूर्वपरवानगीने शक्य असल्यास त्यांना त्यांच्या एकूण जमिनीच्या किंमतीच्या साधारणत: ५० टक्के जमिनीवर टाऊन प्लॅनिंग स्कीमच्या धर्तीवर मूल्यमापन करून समतुल्य चटईक्षेत्र निर्देशांकासहित विकसित भूखंड देण्यात येईल. जर खासगी जमिनीच्या मालकांनी असा प्रस्ताव नाकारला तर अशी जमीन, जमीन संपादन, पुनर्वसन आणि पुनर्व्यवस्थापन अधिनियम, २०१३ नुसार संपादित करण्यात येईल. यातील भूसंपादनाचा खर्च प्रकल्प राबविणाऱ्या प्रवर्तकाकडून, विकासकाकडून घेण्यात येईल.

कोस्टल रेग्युलेशन झोन - एक आणि झोन - दोनमुळे प्रभावित झालेल्या क्षेत्रात झोपडपट्ट्या असतील तर अशा झोपड्यांचे झोपडपट्टी समूह पुनर्विकास योजनेत एकत्रीकरण केले जाईल. तसेच त्यातील झोपडपट्ट्यांचे झोपडपट्टी समूह पुनर्विकास योजनेच्या कोणत्याही भागात पुनर्वसन केले जाईल.

झोन- एक वरील झोपड्यांचे पूनर्वसन केल्याने मोकळ्या झालेल्या जागेवर नियमानुसार द्याव्या लागणाऱ्या सार्वजनिक सुविधा उभारण्यात येतील. तसेच झोन- दोन वरील झोपड्यांचे पुनर्वसन केल्याने मोकळ्या झालेल्या जागेवर विकासकास नियमानूसार विक्री घटकाचे बांधकाम करता येईल.

झोपडपट्टी समूह पुनर्विकास योजनेत, जर प्रत्यक्षात पुनर्वसनापेक्षा जास्त बांधकाम करणे शक्य असेल, तर ४ चटई क्षेत्र निर्देशांकाच्या मर्यादेपेक्षा अधिक बांधकाम करण्याची परवानगी दिली जाऊ शकते. मात्र, असे बांधकाम केवळ समूह पुनर्विकास योजनेबाहेरील जागेवर विकास करण्यासाठी योग्य नसलेल्या झोपडपट्ट्या हटविण्यासाठी अथवा प्रकल्पग्रस्त व्यक्ती (झझ) पुनर्वसनासाठीच वापरले जाईल. अशा बांधकामासाठी विकास नियंत्रण नियमावली, २०३४ च्या विनियम ३३ (१०) अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येईल.

# पत्रकारितेच्या अखंडित प्रवासाला २३ वर्षे पूर्ण..!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सर्वांचे मनःपूर्वक आभार..!!

माझ्या पत्रकारितेची २३ वर्षे म्हणजे अनुभव, संघर्ष, आणि वाचक अन् समाजाशी जुळलेली एक वाटचाल आहे. आज माझ्या पत्रकारितेच्या अखंडित प्रवासाला २३ वर्षे पूर्ण होत आहेत. हे वर्ष केवळ तारखांचा आकडा नसून, प्रत्येक दिवस अनुभव, शिकवण आणि समाजसेवेचा एक नवा धडा ठरला. या प्रवासात मला नेहमीच सर्वांचा विश्वास, सहकार्य आणि वाचकांचे अपार प्रेम मिळाले किंबहुना हेच माझे खरे बळ आहे. यामुळे मी ही वाटचाल जोमाने करीत राहिलो. संकटं, अडचणी आल्या पण काही मित्र व आपल्या पाठबळामुळे नाउमेद न होता सामना करू शकलो. पत्रकारितेचा हा अखंड, अथक प्रवास करू शकलो. याबद्दल सर्वांचा मी कृतज्ञ आहे. प्रत्येक वर्षाच्या टप्प्यावर सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे महत्त्वाचे आहे. त्यातून मला नवी स्फूर्ती आणि पुढील वाटचालीचे बळ मिळते.

B.A., M.S.W. , B.J. पर्यंत मी शिक्षण पूर्ण केले आणि विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार प्रेरणेतून पत्रकारिता क्षेत्रात वृत्तसेवा करण्याचा निर्णय घेतला. तत्पूर्वी सुरुवातीच्या काळात प्रशिक्षणार्थी म्हणून दैनिक लोकमतमध्ये पत्रकारितेचे धडे गिरवता आले. त्यानंतर दैनिक एकमत, वृत्तरत्न सम्राट, लोकशासन, जनमत , पंढरी भूषण, सुराज्य , तरूण भारत संवाद, सोलापूर भूषण, तरूण भारत या वृत्तपत्रात काम करण्याची संधी मिळाली.या विविध दैनिकातून पत्रकार ते वृत्तसंपादक पदापर्यंतच्या कामाच्या वाटचालीत समाधान मिळाले.

विविध दैनिकात काम करताना सर्वांचे सहकार्य लाभले. अनेकांची साथ मिळाली.चढ-उतार आले. कार्यरत राहिलो. संविधान निष्ठा ठेऊन आजपर्यंतच्या या काळात अनेक प्रश्न मांडले. विविध विषयांवर प्रकाशझोत टाकला आणि नवे विषय मांडण्याचा प्रयत्न केला. अनुभव व निरीक्षणातून खूपकाही समजून घेता आले. सध्या दैनिक तरुण भारतमध्ये महापालिका बीट सांभाळत आहे. चांगले काम करता आले. दैनिक तरुण भारतमध्ये विविध विषयांवर विशेष पाने साकारता आली. राजकीय विश्लेषण प्रसिद्ध झाली. महापालिकेतला आवाज हे सदर नियमितपणे सुरू आहे. त्याला वाचकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. सर्वांचे सहकार्य आणि प्रोत्साहन मिळाले.



दरम्यान, विविध पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यामुळे ऊर्जा आणि बळ मिळाले. या प्रवासात मला साथ दिलेल्या संपादक, सहकारी, वाचक, प्रशासनातील अधिकारी, मित्रपरिवार आणि माझ्या कुटुंबीयांचे मनःपूर्वक आभार...! तुमच्या प्रोत्साहनामुळेच आजही संविधान निष्ठ, सत्य, समाज आणि संवेदना मूल्यांना धरून मी लेखणी चालवू शकलो.

प्रेरणा ट्रेनिंग इन्स्टिट्यूटच्याद्वारे सुरू केलेल्या पत्रकारिता प्रशिक्षण कोर्सला चांगला प्रतिसाद मिळाला. मिळत आहे. गेल्या दहा वर्षापासून माध्यम साक्षरता चळवळ वृद्धीगत करण्यासाठी हा छोटासा प्रयत्न करत आहे. सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचा खजिनदार आणि सोलापूर महापालिका पत्रकार संघाचा अध्यक्ष होण्याचा मान सर्वांच्या प्रेम आणि सहकार्यामुळेच लाभला आहे.

पत्रकारिता केवळ व्यवसाय नाही, तर समाजाशी असलेले उत्तरदायित्व आहे. सत्य मांडण्याची जबाबदारी आणि लोकांच्या भावना शब्दांत व्यक्त करण्याचे सामर्थ्य या दोन्हींची सांगड या २३ वर्षांत घालण्याचा मी प्रयत्न केला.

राष्ट्रहिताचा ध्यास – लोक कल्याणाची आस हे ब्रीद घेऊन वाटचाल करीत आहे. अनेक प्रश्न, समस्या मांडल्या. हे सारं करत असताना आपण माणुसकीचा पहारेकरी आहोत याचा विसर पडू दिला नाही. मागील वर्षी ६ ऑक्टोबर २०२४ रोजी माझ्या पत्रकारितेच्या २२ वर्षपूर्तीनिमित्त पत्रकार किरण बनसोडे नागरी सत्कार समितीच्या वतीने पत्रकारिता भूषण पुरस्काराने नागरी सत्कार समारंभ आयोजित केला होता. या अविस्मरणीय कार्यक्रमामुळे नवी ऊर्जा मिळाली.

२३ वर्षांची ही वाटचाल म्हणजे माझ्या आयुष्यातील प्रेरणादायी अध्याय होय. प्रत्येक बातमी ही जबाबदारी, प्रत्येक शब्द ही जनतेची अपेक्षा होती. लेखणी ही माझी ओळख आणि समाजसेवा ही माझी प्रेरणा ठरली. बातम्यांच्या मागे धावण्यातच आयुष्याचे खरे अर्थ सापडले. प्रशासन, अधिकारी आणि मित्रपरिवार यांचा सहकार्यभाव अमूल्य ठरला. कुटुंबीयांचा आधार, प्रोत्साहन या प्रवासाची खरी शक्ती ठरली. ही २३ वर्षांची वाटचाल म्हणजे शिकण्याचा, जपण्याचा आणि वाढण्याचा नियमित प्रवास.........!

हम तो बस अपना फ़र्ज़ निभाते गए,
सच की राह पर क़दम बढ़ाते गए।
आपका साथ, भरोसा और
दुआएँ ही थीं,
जो हर मुश्किल को मुस्कान में
बदलते गए !

मागे वळून पाहताना काय मिळवलं तर आपल्या सारखी लाख मोलाची प्रेमळ माणसे मिळवली. याचा खूप खूप आनंद आणि सार्थ अभिमान वाटतो. यापुढेही आपले खंबीर पाठबळ, सहकार्य, सदिच्छा , शुभेच्छा, प्रेम व आशीर्वाद असेच लाभो. हीच नम्र अपेक्षा.....! सर्वांचे मनःपूर्वक आभार..! सर्वांप्रती मी कृतज्ञ आहे.....!!

**आपला ,**
**किरण बनसोडे**

## संपादकीय....

## झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास

मुंबईतील क्षेत्रात मोठ्या खासगी, शासकीय, निमशासकीय भुखंडावरील झोपडपट्ट्यांच्या विकासासाठी बृहन्मुंबई झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या माध्यमातून झोपडपट्टी समूह पुनर्विकास योजना राबविण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. मुंबईत झोपड्या व त्याचबरोबर काही जुन्या मोडकळीस आलेल्या इमारती, बांधकामे, भाडेकरू व्याप्त इमारती, बांधकाम अयोग्य मोकळ्या जागा तसेच काही वस्त्या आहेत. अशा क्षेत्राचा पुनर्विकास नगर नियोजनाच्या दृष्टीने एकात्मिक व शाश्वत पध्दतीने व्हावा यासाठी ही समूह पुनर्विकास योजना राबविण्यात येणार आहे. जेणेकरून सर्व नागरी सुविधांचा विकाससुध्दा अत्याधुनिक व शास्त्रीय पध्दतीने करता येऊन, या ठिकाणच्या नागरिकांचे जीवनमान सुकर होईल. त्यासाठी समूह पुनर्विकासाची विशेष योजना आखण्यात आली आहे. या योजनेतील तरतुदी प्रमाणे, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण हे झोपडपट्टी समूह पुनर्विकास योजनेसाठी नोडल एजन्सी असेल. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण किमान ५० एकर सलग क्षेत्रफळ असलेल्या जमिनीचे समूह निश्चित करेल, ज्यामध्ये ५१ टक्के पेक्षा जास्त झोपडपट्टी क्षेत्राचा समावेश असेल. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई यांनी निर्धारित केलेल्या समूह क्षेत्रास अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात येणाऱ्या उच्चस्तरीय समितीची व त्यानंतर शासन मान्यता देण्यात येईल. ही पुनर्विकास योजना शासकीय संस्थेला संयुक्त उपक्रम मार्गाने राबविण्यासाठी द्यावी किंवा निविदा प्रक्रियेद्वारे खासगी विकासकाची नेमणूक करावी किंवा एखाद्या विकासकाकडे अशा समूह पुनर्विकास योजनेच्या एकूण क्षेत्रफळापैकी ४० टक्क्यांपेक्षा अधिक क्षेत्र असल्यास, तिथे विकासकामार्फत समूह पुनर्विकास योजना राबविण्याचा निर्णय उच्च स्तरीय समितीच्या शिफारशीनुसार शासनाच्या पूर्व परवानगीने घेण्यात येईल. केंद्र शासनाच्या तसेच त्यांच्या अधिपत्याखालील उपक्रमांच्या जमिनीच्या बाबतीत, जर केंद्र शासनाने/संबंधित उपक्रमांनी संमती दिली तर ही जमीन झोपडपट्टी समूह पुनर्विकास योजनेत समाविष्ट केली जाईल. झोपडपट्टी समूह पुनर्विकास योजनेतील काही इमारती विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०३४ मधील विनियम ३३(१०) व्यतिरिक्त इतर तरतुदींनुसार (उदा. ३३(७), ३३(५), ३३(९) किंवा अन्य) विकासास पात्र असतील, तर अशा इमारतींचा समूह पुनर्विकासामध्ये समावेश केल्यास त्यांना ३३(१०) अंतर्गत देण्यात येणारा लाभ किंवा संबंधित तरतुदींनूसार मिळणारा लाभ यांपैकी जो जास्तीचा असेल तो देण्यात येईल.

## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ३१ हजार ६२८ कोटींचे पॅकेज

(पान १ वरून..) झाले आहे. जमीन खरडून गेल्यामुळे भविष्यात पीक घेण्याचे संकट शेतकऱ्यांसमोर उभे ठाकले आहे. मात्र शेतकऱ्यांनी काळजी करायची गरज नसून शासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. पूरग्रस्त भागातील नागरिकांना पुन्हा उभे करण्यासाठी शासन सर्व उपाययोजना करीत आहे. खरडून गेलेल्या जमिनींना प्रति हेक्टरी ४७ हजार रूपये मदत देण्यात येणार आहे. तसेच मनरेगा (महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना) मधून तीन लाख रूपये प्रति हेक्टरी देण्यात येतील.

रब्बीच्या हंगामासाठी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी १० हजाराची मदत मिळणार आहे. केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर झाल्यानंतर केंद्रही शेतकऱ्यांना मदत करणार आहे. केंद्र शासनही शेतकऱ्यांच्या पाठीशी असून शेतकरी सन्मान योजनेतून मदत करीतच आहे. राज्य शासनही नमो शेतकरी सन्मान योजनेच्या माध्यमातून वार्षिक सहा हजार रूपयांची मदत देत आहे. या मदतीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्याला पुन्हा उभे राहण्यास निश्चितच मदत मिळणार असल्याची खात्रीही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी दिली.

**एनडीआरएफचे निकष बाजूला ठेवून शेतकऱ्यांना तीन हेक्टरपर्यंत मदत – उपमुख्यमंत्री अजित पवार**

राज्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या नुकसानीमुळे शेतकरी चिंताग्रस्त असून त्याच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे आहे. नुकसानग्रस्त प्रत्येक शेतकऱ्याला मदत करण्याची शासनाची भूमिका आहे. शेतकऱ्यांना राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे दोन हेक्टरपर्यंत मदतीचे निकष बाजूला ठेवून तीन हेक्टरपर्यंत मदत करण्यात येणार आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

पावसामुळे आलेल्या पुरात शेतजमिनी खरडून गेल्या ओहत. अनेक शेतकऱ्यांची जनावरे मृत पावली असून गोठ्यांचेही नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना पुन्हा उभे करण्यासाठी शासन पॅकेजच्या माध्यमातून भरीव मदत करीत आहे. या मदतीपासून कुणीही वंचित राहणार नाही, याची काळजी घेण्यात येत आहे. तरीही कुणी मदतीपासून राहून गेले असल्यास त्यांनाही निश्चित मदत करण्यात येईल, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

**दुष्काळी सवलती लागू**

जमीन महसुलात सुट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेती कर्ज वसुलीला स्थगिती, शाळा, महाविद्यालय परीक्षा शुल्कात माफी, रोहयो कामात शिथिलता, शेती पंपाची वीज जोडणी खंडित न करणे.

# विद्यार्थ्यांना चांगले व उच्च शिक्षण मिळावे यासाठी मविप्र संस्था नेहमी कटिबद्ध : उपाध्यक्ष विश्वासराव मोरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर प्रतिनिधी ( सोमनाथ गिरी ):- जीवनात आरोग्य फार महत्त्वाचे आहे .चांगले आरोग्य ठेवण्यासाठी जास्तीत जास्त पाणी सेवन करणे गरजेचे आहे. पाण्याचे जीवनात अनन्य साधारण महत्त्व आहे. शुद्ध पाणी पिल्याने आरोग्य चांगले राहते असे प्रतिपादन मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे उपाध्यक्ष विश्वासराव मोरे यांनी केले .

डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात वॉटर प्युरिफायर उद्घाटन सोहळ्याप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

श्री.मोरे पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांना चांगले व उच्च शिक्षण मिळावे यासाठी मविप्र संस्था नेहमी कटिबद्ध असते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सुख सुविधा मिळाल्या पाहिजे.

मविप्र संस्थेचे सिन्नर तालुका संचालक कृष्णाजी भगत यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. व्यासपीठावर मविप्र संस्थेचे दिंडोरी तालुका संचालक प्रवीण नाना जाधव ,गोदावरी आणि लक्ष्मी वैद्य फाउंडेशन मुंबई ऑस्टेनीटिक द्राक्षतर परिवाराचे एरिया डेव्हलपमेंट मॅनेजर विकास दवंगे, योगेश दवंगे, लायन्स क्लब ऑफ सिन्नर सिटीचे अध्यक्ष बबनराव वाजे,सिन्नर उड्डाण फाउंडेशनचे दत्तात्रय गोजरे, शालेय समितीचे अध्यक्ष नारायण वाजे, उच्च माध्यमिक समितीचे अध्यक्ष विठ्ठल वामने ,सरपंच रामनाथ पावसे,शंकरराव वामने,माजी सरपंच शरद माळी ,अर्जुन वाजे ,अशोकराव गवळी, काशिनाथ वाजे,विद्यालयाचे प्राचार्य रंगनाथ उगले आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वॉटर प्युरीफायरचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी बोलताना संचालक प्रवीण जाधव म्हणाले की





पाणीही आरोग्याची व यशाची गुरुकिल्ली आहे विद्यार्थ्यांनी चांगला आरोग्यासाठी पाण्याची जास्तीत जास्त सेवन करणे गरजेचे आहे जीवनात कष्टाचे महत्त्व खूप आहे विद्यार्थ्यांनी अभ्यासाचे कष्ट घेतल्यास यश हमखास मिळणार आहे असे ते म्हणाले.

गोदावरी आणि लक्ष्मी वैद्य फाउंडेशन मुंबई या संस्थेचे वतीने दोन लाख पन्नास हजार रुपये किंमतीचे वॉटर प्युरिफायर तसेच उड्डाण फाउंडेशनचे दत्तात्रय गोजरे यांनी आपली आई सत्यभामा सदाशिव गोजरे स्मरणार्थ पाच हजार रुपये किंमतीची पाण्याची टाकी दिली. विद्यालयाच्या वतीने स्वागतगीत सादर करण्यात आले. अखंड हिंदुस्थानाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज व विद्येची देवता सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. उपस्थित मान्यवरांचा विद्यालयाच्या वतीने वाचनीय पुस्तक ,शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे प्राचार्य रंगनाथ उगले यांनी केले. सूत्रसंचालन सोमनाथ गिरी यांनी तर आभार पर्यवेक्षिका जयश्री पगारे यांनी मानले. यावेळी शालेय समितीचे सदस्य भाऊपाटील वारुंगसे, रामकृष्ण वाजे समीर सय्यद, सुनील ससाणे ,पोलीस पाटील रामदास वारुंगसे, उडान फाउंडेशन संस्थेचे बाळासाहेब शिंदे,गणेश तांबोळी, शंकर शेलारआदींसह शालेय समितीचे सदस्य सभासद पालक विद्यार्थी शिक्षक शिक्षकेतर सेवक उपस्थित होते.

## भारतरत्न डॉ. आंबेडकर यांच्या भव्य स्मारकाचा सामाजिक न्याय मंत्र्यांनी घेतला आढावा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

विजय घनघाव/मुंबई : इंदू मिल, दादर येथे उभारण्यात येत असलेले भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक आणि पुतळ्याच्या कामाचा आढावा सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी घेतला. यावेळी आनंदराज आंबेडकर, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

पुतळा उभारणीबाबत शिल्पकार राम सुतार यांच्या महत्त्वपूर्ण सूचनांचा विचार केला आहे. पुतळ्याच्या तांत्रिक बाबींवर विशेष लक्ष केंद्रित केले असून तो विहित वेळेत उभारण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखला आहे. डिसेंबर २०२६ पर्यंत स्मारकाचे काम पूर्ण करण्याचा मानस आहे, असे मंत्री संजय शिरसाट म्हणाले.

## लोकशाही दिनात १७ शासकीय कार्यालयाकडे ३० तक्रार अर्ज प्राप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन घेण्यात येतो. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित आजच्या लोकशाही दिनात जिल्ह्यातील १७ शासकीय कार्यालयात च्या ३० तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. या तक्रारी संबंधित कार्यालयाकडे वर्ग करण्यात येत असून त्या कार्यालयानी तात्काळ या तक्रारींचा निपटारा करावा. तसेच तक्रार करण्यासाठी येत असलेल्या नागरिकांशी सर्व संबंधित कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी चांगली वर्तणूक ठेवावी असे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी दिले.




लोकशाही दिनात संबंधित शासकीय कार्यालयाकडे आलेल्या तक्रारी पुढील प्रमाणे:- जिल्हा परिषद सोलापूर- ३ , पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण – १, पोलीस आयुक्त सोलापूर शहर- ३, जिल्हा अधीक्षक भुमि अभिलेख कार्यालय सोलापूर-३, कामगार आयुक्त- १, सार्वजनिक बांधकाम विभाग- २, तहसिलदार महसूल शाखा-५, तहसिलदार बार्शी-१, तहसिलदार करमाळा- १, महावितरण सोलापूर-१, तहसिलदार मोहोळ- २, दुय्यम चिटणीस गृह शाखा -१, उपजिल्हाधिकारी भूसंपादन समन्वय -२, तहसिलदार उत्तर सोलापूर- १, कार्यकारी अभियंता, महावितरण – २, सहा. आयुक्त नगरपालिका प्रशासन- १, अशा एकुण ३० तक्रारी अर्ज जिल्हा लोकशाही दिनामध्ये प्राप्त झालेल्या आहेत.

# संकटातही मानवतेचा दीप प्रज्वलित करणारा वागदरी कट्टा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : सामाजिक बांधिलकी ही केवळ शब्दांत नव्हे, तर कृतीतून दिसली पाहिजे! – हे वाक्य अक्षरशः साकारत वागदरी ग्रामस्थांनी व वागदरी कट्टा या व्हॉट्सअॅप ग्रुपच्या माध्यमातून एक हृदयस्पर्शी उपक्रम राबविला आहे.

नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे आणि पूरस्थितीमुळे अक्कलकोट तालुक्यातील अनेक शेतकरी आणि नागरिकांचे मोठे नुकसान झाले. या संकटसमयी वागदरी कट्टा ग्रुपने मदतीचा हात पुढे करत आपुलकीचा सुंदर संदेश दिला. ग्रुपच्या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत गावकऱ्यांनी मिळून तब्बल एक लाख बेचाळीस हजार रुपये जमा केले. या निधीतून गरजूंना जीवनावश्यक वस्तूंचे किट तयार

**पूरग्रस्तांसाठी वागदरीकरांचा सामाजिक बांधिलकीचा आदर्श उपक्रम**

करून अक्कलकोट तहसीलदार कार्यालयात सूपूर्द करण्यात आले.

या वेळी तहसीलदार मगर साहेब यांच्या हस्ते किट स्वीकृत करण्यात आले. त्यांनी वागदरीकरांच्या या उपक्रमाचे मनापासून कौतुक करत म्हटले, वागदरी कट्टा ग्रुपचा हा आदर्श उपक्रम समाजाला प्रेरणा देणारा आहे. संकटसमयी एकत्र येणे हीच खरी ताकद आहे.

या उपक्रमात उमेश पोमाजी, मारुती शिंदे, शांतू कोटे, रमेश मंगाणे, शिवराज पोमाजी, बापूराव चव्हाण, घाळया मठपती, मलकप्पा पोमाजी, बसवराज शेळके, सुनिल सावंत, संतोष पोमाजी, रवी वरनाळे, श्रीकांत इंडे, दत्ता वरनाळे तसेच अनेक वागदरी ग्रामस्थ उपस्थित होते.

तहसिल कार्यालयात रमेश सावंत, भासगी सर्कल, तलाठी कोळी साहेब आदी अधिकारीही उपस्थित होते.

या उपक्रमातून वागदरी कट्टा ग्रुपने समाजाप्रती असलेली आपली सामाजिक बांधिलकी,




एकता आणि सेवाभाव पुन्हा एकदा सिद्ध केला आहे.

गावकऱ्यांच्या या उदारतेचा आणि एकतेचा ठेवा खरोखरच प्रेरणादायी आहे.

आपुलकीचा, मदतीचा आणि एकतेचा – हाच वागदरीचा खरा कट्टा!

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पालकमंत्री जयकुमार गोरे व जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या निर्देशानुसार बार्शी तालुक्यात अतिवृष्टीने वाहून गेलेल्या रस्त्यांची दुरुस्ती युद्धपातळीवर

## काटेगाव येथील पुलाच्या नळकांड्या वाहून गेलेल्या होत्या, त्या पुन्हा नव्याने टाकून रस्ता वाहतुकीस सुरू केला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : जिल्ह्यात अतिवृष्टी व पुरामुळे शेती पिकांचे, घरांचे तसेच रस्त्यांचे खूप मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. अनेक गावांना जोडणारे रस्ते पूल वाहून गेल्यामुळे गावांचा संपर्क तुटलेला होता. त्यामुळे पालकमंत्री जयकुमार गोरे व जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच जिल्हा परिषदेचा सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी जिल्ह्यातील सर्व रस्त्यांची पाहणी करून नादुरुस्त रस्ते, पुल तात्काळ दुरुस्त करून गावोगावीची दळणवळण व्यवस्था सुरळीत करण्याबाबत निर्देशित केलेले होते. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने नुकसानग्रस्त रस्त्यांची माहिती घेऊन ते रस्ते तात्काळ दुरुस्त करण्याची कार्यवाही जिल्ह्यात सर्वत्र सुरू आहे.

अतिवृष्टीमुळे बार्शी तालुक्यातील अनेक भागांतील रस्ते, मो-या व पुलांचे पोहचमार्ग नुकसानग्रस्त झाले असून काही ठिकाणी वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. यामुळे नागरिक, शालेय विद्यार्थी, महिला व रुग्णांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.

पाऊस ओसरताच सार्वजनिक बांधकाम विभाग तात्काळ क्शन मोडमध्ये आला. सार्वजनिक बांधकाम मंडळाचे अधीक्षक अभियंता श्याम कुंभार व कार्यकारी अभियंता अ. बा. भोसले यांनी बार्शी तालुक्यातील पूरग्रस्त व क्षतिग्रस्त रस्त्यांची पाहणी करून आवश्यक दुरुस्ती तातडीने सुरू करण्याच्या सूचना दिल्या.

त्यानुसार उपअभियंता विक्रांत चव्हाण, उपअभियंता आकाश नलावडे तसेच सर्व कनिष्ठ अभियंते व विभागीय कर्मचारी यांनी मिळून युद्धपातळीवर रस्त्यांची दुरुस्ती सुरू केली आहे. तात्पुरत्या स्वरूपात मुरूम भरावा, पोहचमार्ग दुरुस्ती व पाण्याचा निचरा करण्याची कामे वेगाने सुरू असून नागरिकांच्या सुरक्षित व सुलभ वाहतुकीसाठी सर्व आवश्यक खबरदारी घेतली जात आहे.

काटेगाव चारे पाथरी पांगरी रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक २९ रस्त्यावरील काटेगाव येथील नळकांडी पूल अतिवृष्टी मुळे पुर्णता वाहून गेला होता त्याठिकाणी नळकांड्या व मुरूम भरावा करून रस्ता वाहतुकीसाठी सुरू करण्यात आला आहे. आज दिनांक ०६ ऑक्टोबर २०२५ रोजी सर्व महत्त्वाच्या मार्गांवरील पोहचमार्गांची दुरुस्ती पूर्ण करण्यात आली असून बार्शी तालुक्यातील प्रमुख गावांदरम्यान वाहतूक पुन्हा सुरू झाली आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व कर्मचारी रस्ते वाहतुकीचा सुरळीत प्रवाह लवकरात लवकर सुरू करण्यासाठी मेहनत घेत आहेत. सर्व कामे सुरक्षा व तांत्रिक नियमांचे काटेकोर पालन करून केली जात आहेत.



## अ. भा. बलुतेदार अलुतेदार विकास परिषदेच्या विभागीय अध्यक्षपदी सुदर्शन बोराडे यांची निवड झाल्याबद्दल विश्वकर्मीय समाजातर्फे सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर/प्रतिनिधी अमर जाधव : अखिल भारतीय बलुतेदार अलुतेदार विकास परिषद या संघटनेच्या मराठवाडा विभागीय अध्यक्षपदी सुदर्शन बोराडे यांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे कळतात कार्यकर्त्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

सुदर्शन बोराडे यांनी आजपर्यंत बलुतेदार विषयी केलेले काम व समाजातील विविध जाती धर्मातील लोकांना सोबत घेवून चालण्याची हातोटी याची दखल घेवुन अखिल भारतीय बलुतेदार अलुतेदार विकास परिषद या संघटनेच्या वतीने मराठवाडा विभागीय अध्यक्ष या पदावर सुदर्शन बोराडे नियुक्ती करण्यात आली आहे. आज हे कळता सकल विश्वकर्मीय समाजातर्फे त्यांचा भव्य दिव्य सत्कार करताना भागवत पांचाळ, मोहन भाऊ पोद्दार, धनंजय पांचाळ, सौरभ पांचाळ, कृष्णा पांचाळ ,विरनाथ पांचाळ उपस्थित होते.

## माढा तालुका शिवसेनेच्या वतीने पूरग्रस्तांना मदतीचा हात






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माढा तालुक्यातील पूर परिस्थितीमुळे अडचणीत आलेल्या शेतकरी बांधवांना दिलासा देण्यासाठी माढा तालुका शिवसेनेच्या वतीने आवश्यक साहित्य, अन्नधान्य, कपडे, अंथरूण, इत्यादी मदत प्रशासनात सुपूर्त करण्यात आली.

या माध्यमातून गरजू कुटुंबाच्या चेहऱ्यावर आनंद आणि दिलासा निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

या मदत उपक्रमात अनेक कार्यकर्त्यांनी, पदाधिकाऱ्यांनी आणि स्थानिक नागरिकांनी उस्फुर्त सहभाग नोंदवला व शिवसैनिकांनी जनतेच्या सेवेसाठी दाखवलेल्या तत्परता आणि संवेदनशीलता हेच पक्षाच्या जनसेवेचे खरे बळ आहे.

माढा तालुका शिवसेना सर्व सहकाऱ्यांचे मान्यवरांचे आणि प्रशासनाचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो शिवसेना म्हणजे केवळ राजकारण नव्हे ते आहे लोकसेवेची शपथ व संकटातही उभे राहण्याची ताकद!

यावेळी मा.आ. शहाजी बापू पाटील शिवसेना माढा तालुक्याचे नेते श्री. संजय कोकाटे, सोलापूर जिल्हा शिवसेना संपर्कप्रमुख श्री महेश ( नाना )साठे, शिवसेना नेते मंगेश चिवटे माढा तालुक्यातील शिवसेनेचे प्रमुख नेते कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कौठाळी येथे प्राथमिक शाळेतील शिक्षकांचा सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील कौठाळी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये नवीन आलेल्या शिक्षकांचा स्वागत समारंभ व बदली झालेल्या शिक्षकांचा निरोप समारंभ कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमा प्रसंगी सर्व शिक्षकांचा सन्मान सरपंच महादेव गाढवे माजी सरपंच सुरेखा रघुनाथ गोडसे यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कौठाळी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे माजी चेअरमन ईश्वरा धुमाळ होते




या कार्यक्रमाच्या वेळी सई शिंदे, संध्या काळे, राजाभाऊ पवार, सचिन बाजारे, दशरथ नागटिळक यांनी मनोगत व्यक्त केले. आरोग्य सेविका पी.व्ही. पांढरे यांना सेवेची एक वर्ष पूर्ण झाल्याबद्दल त्यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास मार्केट कमिटीचे संचालक अरुण नागटिळक, मार्केट कमिटीचे माजी संचालक रघुनाथ गोडसे, सोसायटीचे माजी चेअरमन दिलीप इंगळे, आप्पासाहेब आटकळे यांच्या सह बहुसंख्य मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामदास नागटिळक यांनी केले.

## खते, कीटकनाशकांवरील जीएसटी त्वरित शून्य करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : लातूर : केंद्र सरकारने जीएसटी दराच्या रचनेत बदल केला. कृषीशी संबंधित उपकरणांच्या जीएसटी दरात कपात केली. परंतु, महाराष्ट्रासह देशातील अनेक राज्यांत अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यांना दिलासा देण्यासाठी खते आणि कीटकनाशकांवरील जीएसटी शून्य करावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य बाजार समिती संघाचे उपसभापती तथा जिल्हाप्रमुख संतोष भाऊ सोमवंशी यांनी केंद्र सरकारकडे केली आहे.

प्रधानमंत्री कार्यालयाला पाठवलेल्या निवेदनात म्हटले आहे की, केंद्र सरकारने २२ सप्टेंबर रोजी जीएसटी दरात कपात केली.

जीएसटी दराच्या रचनेत केलेल्या बदलानुसार ट्रॅक्टर, ट्रेलर, टायर्स आणि इतर कृषी उपकरणांवर दरकपात केली आहे. परंतु, ही उपकरणे आणि कृषी वाहनांच्या खरेदीचा सरळ लाभ देशातील केवळ पाच टक्के शेतकऱ्यांपर्यंतच

### पंतप्रधानांकडे राज्य बाजार समिती उपसभापती संतोष सोमवंशी यांची मागणी

मर्यादित आहे. जे शेतकरी यांत्रिकीकरणाचा उपयोग करतात त्यांनाच हा लाभ मिळू शकतो. परंतु, देशातील ६० कोटी शेतकरी लहान घटकातील आहेत.

त्यांना तत्काळ आणि सरळ लाभमिळावा, यादृष्टीने खते व कीटकनाशके आदी अँग्रीकल्चर इनपुटवर जीएसटी दर शून्य करण्याची मागणी करण्यात आली आहे.

खतावर जीएसटीचा सध्याचा दर ५% कीटकनाशके सध्याचा दर १८% आहे कृषीसाठी लागणारी खते आणि कीटकनाशके तसेच इतर

खर्चावर लागणारा जीएसटी शून्य केल्यास शेतीचा उत्पादन खर्च कमी होईल. या निर्णयाचा देशातील ६० कोटींपेक्षा जास्त शेतकऱ्यांना लाभ मिळू शकेल. शेतकऱ्याऱ्यांना सशक्त बनवण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल ठरेल. खते आणि कीटकनाशकांवरील जीएसटी शून्य केल्यास शेतकऱ्यांना फायदा होईल. अशी मागणी महाराष्ट्र राज्य बाजार समिती संघाचे उपसभापती तथा जिल्हाप्रमुख संतोष भाऊ सोमवंशी यांनी पंतप्रधानांना केली आहे.

**१३६ वी वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न**

**बी. बी. मेश्राम यांचे प्रतिपादन**

# माणूसकीयुक्त समाज निर्माण करण्यासाठी आपली शक्ती पणाला लावली पाहिजे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन, त्रिरत्न बुद्ध विहार व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने त्रिरत्न बुद्ध विहार, सह्याद्री नगर, छ-५, सिडको, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे मला धर्म जास्त प्यार आहे आणि त्यासाठीच मी माझी शक्ती वेचणार आहे. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाच्या ६९ व्या वर्धापन दिनानिमित्त सदरील प्रासंगिक विषयावर १३६ वी वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा ५ ऑक्टोबर २०२५ ला संपन्न झाली.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, आज आपण १३६ व्या कार्यशाळेत चर्चा करीत असताना आपल्या समाजाची स्थिती ३६ च्या आकडया प्रमाणे झालेली आहे. ज्यामुळे एकाच विचारधारेला माणणारे कार्यकर्ते परस्परांचे तोंड पाहायला तयार नाहीत. तरी ६९ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा करीत असताना ६९ या इंग्रजी आकड्यातील दोन्ही अंक परस्पराकडे बघून हसताना दिसत आहेत. ती परिस्थिती आपल्या समाजात कधी निर्माण होईल? यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. समाज जीवनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिका, संघटित व्हा, संघर्ष करा असे म्हटल्याचा प्रचार केला जातो. मात्र आपण हे लक्षात घेतले पाहिजे की ९ मार्च १९२४ ला मुंबईच्या दामोदर हॉलमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एर्वीलरींश, सळींरींश रपव जीसरपळीश अर्थात सुशिक्षित करा, संघर्ष करा आणि संघटित व्हा म्हणजे सुशिक्षित झाल्यावर संघटित होण्यासाठी संघर्ष केला पाहिजे आणि संघटित झाल्यावर हक्क अधिकारासाठी संघर्ष केला पाहिजे असे म्हटले होते. परंतु आपण तसे न केल्यामुळे आपला समाज संघटित होऊ शकलेला नाही. परिणामी संघर्षाला फारसे यश प्राप्त होत नाही. तसेच शिकल्या सवरलेल्या लोकांनी डॉ. आंबेडकरांना धोका दिला आहे, असेही म्हटले जाते. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तसे म्हटलेले नाही तर १८ मार्च १९५६ ला आग्र्याच्या रामलीला मैदानावर दिलेल्या भाषणात त्यांनी अस्पृश्यांच्या घराघरात ज्ञानगंगेचा प्रवाहने नेणे, सरकारी नोकऱ्यांमध्ये त्यांना व्यापक प्रतिनिधी मिळवून देणे व खेड्यापाड्यातील अस्पृश्य जनतेची सर्वांगीण सुधारणा करणे हे त्यांच्या मागील पंचवीस वर्षातील राजकारणाचे उद्दिष्ट असल्याचे स्पष्ट केले होते. याचा प्रचार प्रसार करून शासनकर्ती जमात होण्यासाठी प्रशिक्षित कार्यकर्त्यांची आवश्यकता असल्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संदेशाप्रमाणे ट्रेनिंग स्कूल फॉर एंट्रन्स टु पॉलिटिक्स चालविण्यासाठी सर्व पक्ष, संघटन, संस्थांनी प्रयत्न केले पाहिजेत. करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १५ ऑक्टोबर १९५६ ला नागपूरच्या श्याम हॉटेलमध्ये मला राजकारणापेक्षा धर्म जास्त प्यारा आहे आणि त्यासाठीच मी माझी सक्ती वेचणार आहे. असे म्हटले होते याची करिता आपण माणूसकीयुक्त समाज निर्माण करण्यासाठी आपली शक्ती पणाला लावली पाहिजे. याची जाणीव ठेवून फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन निरंतरपणे कार्यरत आहे.

उद्घाटनपर मार्गदर्शन करताना सामाजिक कार्यकर्त्या, लेखिका आर. बी. बनसोडे म्हणाल्या की, इतिहासात आपली फार वाईट अवस्था होती. आपली परिस्थिती सुधारण्यासाठी भारताचे संविधानात तरतुदी केलेल्या आहेत, त्याचा आपण लाभ घेतला पाहिजे. शिक्षणापासून वंचित ठेवण्यासाठी आपणास दर्जेदार शिक्षण नाकारले जात आहे, करिता आपण जागृत राहिले पाहिजे.

प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष एस. एस. बोरकर म्हणाले की, धम्मासाठी जीवन समर्पित आणि व्यतीत केले पाहिजे. वर्तमानातील धम्माच्या स्थितीला उपासक जबाबदार आहेत. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ ला आपणास धम्मचक्र प्रवर्तन दिनी धम्माची दीक्षा दिली. त्यांना सारा भारत बौद्धमय करायचा होता. करिता त्यांनी शिका, संघटित व्हा, संघर्ष करा असा नारा दिला होता. तर शिकलेल्या लोकांनी मला धोका दिलेला आहे असेही म्हटले होते. करिता आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या पक्ष संघटन संस्था चालविल्या पाहिजेत.



याप्रसंगी डॉ. व्ही. एच. कांबळे म्हणाले की, जबाबदार उपासक निर्माण न झाल्याने सर्वत्र धम्माची वाईट स्थिती आहे. बेरोजगारीचे प्रमाण वाढत असल्याने शिकून तरी काय करायचे? असा विचार करून गरिबा घरची मुले शिक्षणापासून वंचित राहत आहेत. मिठूसिंग बहूरे म्हणाले की, बाबासाहेबांना विरोध असताना सुद्धा त्यांनी विपरीत परिस्थितीत कार्य केले आहे. आपण भारताचे संविधानाप्रमाणे समाज निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. रमेश खडसे म्हणाले की खाजगीकरणाच्या विरोधात आंदोलने केली पाहिजेत. महादेव डांबरे म्हणाले की विषय धार्मिक वाटत असला तरी याचा संबंध हा समाज व राजकारणाशी आहे. हे भाषण म्हणजे आयुष्यातील संपूर्ण चळवळीचा सारांश आहे. जी. एस. दोडवे म्हणाले की, आवड असेल, तिथे सवड मिळते. तरी सवड काढून कार्यक्रमाला आले पाहिजे. सत्य स्वीकारण्यासाठी असत्य सोडावे लागेल. डॉ. डी. एन. जाधव म्हणाले की, भारतीय बौद्ध महासभेच्या उद्देशावर आपण कार्य केले पाहिजे.

सुरुवातीला आदर्शांना पुष्प अर्पण करून त्रिरत्न बुद्ध विहार समितीच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. पंचशील त्रिसरणाने सुरुवात करण्यात आली. सूत्रसंचालन ॲड. विलास रामटेके तर प्रास्ताविक डॉ. रमेशचंद्र धनेगावकर व आभार महादेव डांबरे यांनी व्यक्त केले. या कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, ॲड. विलास रामटेके, डॉ. व्ही. एच. कांबळे, मिठूसिंग बहूरे, डॉ. रमेशचंद्र धनेगावकर, महादेव डांबरे, जे. बी. हातोले, के. पी. आढाव, आर. बी. बनसोडे, कल्पना अवचरमल, चंद्रकांत मस्के, रमेश खडसे, जी. एस. दोडवे, एस. एस. बोरकर, डॉ. डी. एन. जाधव, व्ही. टी. शिरसाट, प्रा. श्रीमंत कांबळे इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.

# सर्वोच्च न्यायालयातील बूटप्रकरणाचा धडा म्हणजेच सर्वोच्च न्यायमंदिरातील असहिष्णुतेची सावली : अ‍ॅड. प्रकाश जगताप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कल्याण/प्रफुल्ल शेवाळे : भारताच्या सर्वोच्च न्यायलयाचे मुख्य न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या वर काल झालेल्या भ्याड हल्ला प्रकरणामुळे आंबेडकरी अनुयायी आणि वकील संघटना यांच्या प्रखर पडसाद उमटत आहे. या अनुषंगाने कल्याण येथे वकील संघटना यांनी कल्याण तह-सीलदार कार्यालय येथे मोर्चा काढून सदर भ्याड हल्ला घटनेचा निषेध केला आहे. यावेळी वकील संघटना मोर्चाचे नेतृत्व कल्याण जिल्हा वकील संघटनेचे अ‍ॅड. प्रकाश जगताप यांनी केले.



यावेळी ड.जगताप म्हणाले की, न्यायालय हे केवळ कायद्याचं नव्हे, तर विवेक, संयम आणि शहाणपणाचं मंदिर आहे.

तिथे उच्च आवाजाने नव्हे, तर युक्तिवादाच्या आवाजाने सत्याचा शोध घेतला जातो.

मात्र आज, भारतीय लोकशाहीच्या सर्वोच्च न्यायमंदिरात एक अशी घटना घडली ज्याने न्यायव्यवस्थेच्या शिस्ती-वर असहिष्णुतेची सावली टाकली.

ही घटना केवळ एका व्यक्तीची चूक नाही, तर संपूर्ण न्यायसंस्थेने आत्म परीक्षण करण्याची वेळ आहे – कारण लोकशाहीत मतभेद व्यक्त करण्याची मर्यादा ही सभ्यतेच्या चौकटीतच असावी लागते.

काल ६ ऑक्टोबर २०२५ – भारतीय लोकशाहीच्या सर्वोच्च न्यायमंदिरात घडलेली एक घटना संपूर्ण न्यायव्यवस्थेच्या प्रतिष्ठेवर काळी छाया टाकून गेली.

सुप्रीम कोर्टात सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या दिशेने एका वकिलाने बूट फेकण्याचा प्रयत्न केला.

सनातनचा अपमान सहन करणार नाही अशी आरोळी देत त्या वकिलाने न्यायालयात अविचारी कृत्य केले; मात्र सुरक्षा रक्षकांनी वेळीच त्याला थांबवले आणि बाहेर काढले.

परंतु या घटनेत सर्वांत उल्लेखनीय बाब म्हणजे – CJI भूषण गवई यांची शांतता आणि आत्मसंयम.

ते म्हणाले –

अशा प्रकारांनी आम्ही विचलित होत नाही. तुम्ही तुमचा युक्तिवाद सुरु ठेवा. ही एका महान न्यायाधीशाची न्यायशीलता आणि विवेकशीलतेची झलक आहे. न्यायाधीश हे भावनांच्या लाटांवर नाही, तर तर्क, संविधान आणि कायद्याच्या तत्वांवर उभे असतात – हे त्यांनी पुन्हा एकदा सिद्ध केले.

न्यायालय म्हणजे संघर्षाचे नव्हे, संयमाचे व्यासपीठ कोर्ट हे लोकशाहीचे पवित्र व्यासपीठ आहे.तिथे आवाज उठवायचा असेल तर तो युक्तिवादाचा आवाज असतो – आरडाओरड्याचा किंवा बूटफेकीचा नव्हे.

वकिलीचा झगा घातलेला प्रत्येक व्यक्ती हा न्यायसंस्थेचा अंगभूत घटक आहे. त्याची भाषा, वर्तन आणि संतुलन हे न्यायालयाच्या प्रतिष्ठेशी थेट जोडलेले आहे.

एका वकिलाने असहिष्णुतेच्या भरात घेतलेली अशी कृती केवळ स्वतःच्या नव्हे, तर संपूर्ण वकिलकीच्या प्रतिमेवर डाग टाकणारी आहे.

न्यायालयात संताप नव्हे, तर शहाणपणाने बोलणे हेच खरे शौर्य आहे.

न्यायव्यवस्थेचा सन्मान राखणे ही प्रत्येक वकिलाची व्यावसायिक आणि नैतिक जबाबदारी आहे.

'सनातन'चा अर्थ सहिष्णुता – असहिष्णुतेचा नव्हे

'सनातन धर्म' हा नावापुरता धर्म नसून, सहनशीलतेचा, क्षमेचा आणि सत्याच्या शोधाचा प्रवास आहे.

सनातन धर्माचा अपमान कोणी करावा हे जितके अयोग्य आहे, तितकेच त्याच्या नावाखाली असहिष्णुतेचे प्रदर्शन करणेही तितकेच चुकीचे आहे.

जर एखाद्याने सनातनच्या नाव-ाखाली हिंसेचे किंवा असंवेदनशीलतेचे प्रदर्शन केले, तर तो स्वतः त्या तत्वांशीच अन्याय करतो.

CJI भूषण गवई हे दलित समाजातून आलेले पहिले सरन्यायाधीश असून, त्यांनी आज दाखवलेले संयम आणि धैर्य हेच खरे सनातन मूल्यांचे प्रतीक आहे – क्षमा, शांतता आणि न्याय.

वकिली ही न्यायसंस्थेची मेरुदंड प्रत्येक वकिलाने लक्षात ठेवावे.आपले शस्त्र म्हणजे बूट नव्हे, कायद्याची भाषा आणि पुराव्याची ताकद.

वकील म्हणजे समाज आणि न्यायालय यांच्यातील पूल – आणि तो पूल तुटू नये, हेच आपले कर्तव्य आहे.

वकील जर कोर्टात संतुलन हरवून बसला, तर समाजाला न्यायाचा मार्ग कोण दाखवणार?

वकिली हा व्यवसाय नाही, ती एक संविधाननिष्ठ जबाबदारी आहे.वकिलांनीच न्यायालयाच्या प्रतिष्ठेला अधिक उजाळा द्यायचा असतो, कारण न्यायमंदिराची पवित्रता टिकवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

न्याय, विवेक आणि संविधानाचा धडा ही घटना जरी धक्कादायक असली तरी ती आपल्याला आत्मपरीक्षणाचा आणि जबाबदारीचा संदेश देते.

न्यायमंदिरात आवाज उठवायचा असेल तर तो युक्तिवादाच्या सौजन्यपूर्ण भाषेत उठावा.

CJI भूषण गवई यांनी दाखव-लेला संयम आणि आत्मसंयम हेच आजच्या असहिष्णु काळात न्याय, लोकशाही आणि सहिष्णुतेचे खरे बळ आहे.

संविधानावर आणि न्यायालयावर विश्वास ठेवणं हेच आजच्या काळातील खरे देशभक्तीचे रूप आहे.

न्यायालयावर विश्वास ठेवा, कारण तिथे राग नव्हे – न्यायाचा धर्म बोलतो.

ही घटना धक्कादायक असली, तरी ती एक महत्त्वाचा धडा देऊन जाते –

रागाने नव्हे, तर तर्काने लढणं हेच न्यायाचा धर्म आहे.

उगख भूषण गवई यांनी दाखवलेला शांत संयम आणि संतुलित प्रतिसाद हेच आजच्या काळात संविधाननिष्ठ विचारसरणी आणि खऱ्या 'सनातन मूल्यांचे' प्रतीक ठरले.

न्यायालयावर, संविधानावर आणि विवेकावर विश्वास ठेवणं हेच खऱ्या अर्थाने देशभक्तीचं चिन्ह आहे.

न्यायालयात राग नव्हे, तर न्यायाचा धर्म बोलतो – आणि त्याच धर्मावर भारताची लोकशाही उभी आहे.

## पदवीधर व शिक्षक मतदार नोंदणीचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : भारत निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार पुणे विभागाच्या पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणूक २०२६ करीता मतदार नोंदणीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. पंढरपूर तालुक्यात मतदार नोंदणीला दिनांक ३० ऑक्टोबर २०२५ पासून प्रारंभ झालेला असून, अधिकाधिक पात्र मतदारांनी मतदार यादीत नांव नोंदवावे, असे आवाहन पदनिर्देशीत अधिकारी तथा तहसिलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.

पदवीधर व शिक्षक या दोन मतदारसंघाची नव्याने मतदार यादी तयार करण्याकरीता दि. ०१ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारीत मतदार नोंदणीचा कार्यक्रम जाहीर झालेला आहे. पंढरपूर तालुक्यात शिक्षक मतदारसंघाकरीता ०८ मतदान केंद्रामध्ये पंढरपूर शहर ०२, पुळूज, करकंब, पट. कुरोली, कासेगाव, भाळवणी, तुंगत येथे प्रत्येकी ०१ व पदवीधर मतदारसंघाकरीता १२ मतदान केंद्रामध्ये पंढरपूर शहर येथे ०५, करकंब येथे ०२, पुळूज, पट. कुरोली, कासेगाव, भाळवणी, तुंगत येथे प्रत्येकी ०१ केंद्र याप्रमाणे अशी एकूण २० प्रारूप मतदान केंद्रे तयार करण्यात आलेली आहेत.

पदवीधर मतदारसंघाकरीता मतदार नोंदणीसाठी अर्ज नमुना क्रमांक १८ हा फॉर्म आणि शिक्षक मतदारसंघाकरीता मतदार नोंदणीसाठी अर्ज नमुना क्रमांक १९ हा पात्र मतदारांनी भरून दयायचा आहे. पदवीधर मतदार नोंदणीकरीता ऑनलाईन अर्ज करण्यासाठी https://mahaelection.gov.in ही लिंक उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. मतदार नोंदणीकरीता एकूण ०७ पदनिर्देशीत अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

मतदार नोंदणी ०६ नोव्हेंबर २०२५ या तारखेपुर्वी दोन्ही मतदारसंघाकरीता पात्र मतदारांनी नांव नोंदवावे, असे आवाहनही पदनिर्देशीत अधिकारी तथा तहसिलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.

## डुबेरे विद्यालयात कर्मवीर डॉ. वसंतराव पवार यांना अभिवादन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर प्रतिनिधी/सोमनाथ गिरी : डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मराठा विद्या प्रसारक संस्थेचे भूतपूर्व सरचिटणीस कर्मवीर डॉ. वसंतराव पवार यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक रंगनाथ उगले होते. व्यासपीठावर पर्यवेक्षिका जयश्री पगारे, पोलीस पाटील रामदास वारुंगसे, कचेश्वर शिंदे, विद्या ठाकरे, रेखा खंडीझोड आदी उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते डॉ. पवार यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. उपशिक्षक सोमनाथ गिरी यांनी डॉ. पवार यांच्या जीवन व कार्याचा आढावा घेतला.

यावेळी बोलताना कार्यक्रमाचे अध्यक्ष रंगनाथ उगले म्हणाले की,डॉ. पवार यांनी शिस्त ,गुणवत्ता व पारदर्शकता या त्रिसूत्रीवर मविप्र संस्थेचा कारभार केला. संस्थेच्या संख्यात्मक व गुणात्मक विस्तारासाठी त्यांनी अविरत प्रयत्न केले. डॉ. पवार यांचे सामाजिक,सहकार,राजकीय,शैक्षणिक,वैद्यकीय साहित्य आदिंसह विविध क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय आहे. सूत्रसंचालन शालेय सांस्कृतिक समितीचे प्रमुख सुनिल ससाणे यांनी तर आभार डी. ए.रबडे यांनी मानले. यावेळी रेवणनाथ कांगणे, सीमा गोसावी, वरिष्ठ लिपिक राणी शिंदे, सरिता कुटे, रवि गोजरे, किशोर शिंदे, ज्ञानेश्वर कडभाने शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश मा. बी. आर. गवई यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : सुधाकर रणदिवे, कळंब येथील उपविभागीय अधिकारी मा.संजय पाटील यांच्या मार्फत देशाचे राष्ट्रपती यांना सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश मा. बी.आर.गवई यांच्या वर झालेल्या हल्लयाच्या निषेधार्थ दि.७ऑक्टोबर २०२५ रोजी लोकजनशक्ती पार्टी च्या वतीने जिल्हाध्यक्ष राजाभाऊ गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देऊन निषेध व्यक्त करण्यात आला. दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश मा. बी. आर. गवई यांच्यावर वकील राकेश किशोर या व्यक्तीने केलेला हल्लयाचा प्रयत्न हा केवळ एका व्यक्तीवर नव्हे, तर भारतीय न्यायव्यवस्थेवर आणि संविधानाच्या मूल्यांवर झालेला गंभीर हल्ला आहे.

ही घटना समाजातील मनुवादी आणि जातीयवादी प्रवृत्तीचे दर्शन घडवते, जी लोकशाही आणि सामाजिक समतेसाठी धोकादायक आहे असे निवेदनात म्हटले आहे. तसेच लोकजनशक्ती पार्टी च्या वतीने काही मागण्या करण्यात आल्या आहेत या मध्ये,आरोपी वकील राकेश किशोर याच्यावर कठोर कलमान्वये कारवाई करण्यात यावी, सर्वोच्च न्यायालय तसेच सर्व न्यायालयांमध्ये सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत करण्यात यावी,जातीय द्वेष आणि मनुवादी प्रवृत्तीला प्रोत्साहन देणाऱ्या घटकांवर चौकशी करून कारवाई करण्यात यावी, आम्ही या घटनेचा तीव्र निषेध करतो आणि न्यायव्यवस्थेच्या गौरवाचे रक्षण करण्यासाठी तातडीने कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर जिल्हाध्यक्ष राजाभाऊ गायकवाड, नागेश धिरे, मुकेश गायकवाड, भारत कदम, बाबासाहेब टोपे, सुंदर जगताप, राजाभाऊ खांडेकर यांच्या स्वाक्षरी आहेत.



## श्री. विठ्ठल व रूक्मिणी मातेस पारंपारिक पोशाखासह सह अलंकार परिधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री. विठ्ठल व रूक्मिणी मातेस नवान्न पोर्णिमा निमित्त पारंपारिक पोशाखासह सह अलंकार परिधान आल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.



श्री विठ्ठलास सोने मुकुट, कौस्तुभ मणी, दंड पेट्या जोड मोठा, हिऱ्याचा कंगण जोड, मोत्याचा तुरा, मोत्याची कंठी २ पदरी, शिरपेच मोठा १० लोलक, मस्त्य जोड, लक्ष्मी पेंडल लॉकेट, तोडे जोड, पदकासह लॉकेट, तांदळ्या ७ पदरी, तुळशीची माल १ पदरी, पुतळ्याची माळ, शाळीग्राम हार, हायकोल, सोन्याचा करदोडा इत्यादि पारंपारिक अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत. तसेच रुक्मिणी मातेस सोने मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तारवाड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमानी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मीहार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा इत्यादि पारंपारिक अलंकार परिधान करण्यात आलेले होते.

मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सर्व सदस्य महोदय व लेखा अधिकारी मुकेश अनेचा यांच्या मार्गदर्शनाखाली नवरात्र उत्सवाची सांगता उत्साहात व भक्तिभावात पार पडल्याचे प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी सांगितले.

**आरोपीवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची केली मागणी**

**कारवाईच्या मागणीसाठी नळदुर्ग पोलिस प्रशासनाला दिले निवेदन**

# देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर बुट भिरकावून भ्याड हल्ला करण्याचा प्रयत्न करणाऱ्या सनातनी मनुवादी नराधमाचा नळदुर्ग येथे रिपाइं (आठवले) च्या वतीने जाहीर निषेध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्याकडे पायातील बूट भिरकावून त्यांच्यावर भ्याड हल्ला करण्याचा प्रयत्न करणाऱ्या जातीयवादी सनातनी मनुवादी नराधम राकेश किशोर यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी करून त्या नराधमाचा नळदुर्ग येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिय (आठवले) नळदुर्ग शहर व तुळजापूर तालुका शाखेच्या वतीने काळ्या फिती लावून जाहीर निषेध करण्यात करून त्याच्यावर देशद्रोही चा गुन्हा दाखल करण्याची केली मागणी.




या संदर्भात रिपाइं (आठवले) च्या वतीने अप्पर तहसील कार्यालय नळदुर्गचे अप्पर तहसिलदार याना देण्यात आलेल्या लेखी निवेदनात म्हाटले आहे की नुकतच दिल्ली येथे सर्वोच्च न्यायालयातील न्याय दालनात जाऊन जातीयवादी सनातनी मनुवादी नराधम राकेश किशोर यांनी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भुषण गवई यांच्यावर बुट भिरकावून भ्याड हल्ला करण्याचा प्रयत्न केला असून त्या भ्याड हल्ला करणाचा प्रयत्न करणाऱ्या नराधमाचा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)च्या वतीने जाहीर निषेध करण्यात येत असून हा निंदनीय प्रकार म्हणजेच देशाच्या लोकशाहीवर देशाच्या न्यायव्यवस्थेवर हल्ला करण्याचा प्रयत्न असून या हल्लेखोर प्रवृत्तीच्या नराधमावर

देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी करण्यात येत आहे. सदर निवेदनाची एक प्रत नळदुर्ग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांच्याकडेही देण्यात आली आहे.

रिपाइं च्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनावर रिपाइंचे जिल्हा सचिव एस.के.गायकवाड जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, रिपाइं तुळजापूर तालुका अध्यक्ष अरुण लोखंडे, नळदुर्ग शहराध्यक्ष मारुती खारवे, लहुजी शक्ती सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष शिवाजी गायकवाड, दलित पँथर चे जिल्हा संपर्कप्रमुख शामकांत नागील,रिपाइं तालूका उपाध्यक्ष महादेव कांबळे, रिपाइं अल्पसंख्याक आघाडीचे तालुका अध्यक्ष बाशिदभाई कुरेशी, रिपाइं, नळदुर्ग सर्कल प्रमुख राजेंद्र शिंदे, ज्येष्ठ कार्यकर्ते कैलास गवळी गुरुजी, दत्ता कांबळे,जयभिम वाघमारे, धर्मराज देडे, प्रकाश बनसोडे, पप्पू गायकवाड, बाबासाहेब कांबळे अतुल बनसोडे, पत्रकार ईरफान काझी, विशाल मुकदान सह असंख्य कार्यकर्त्यांच्या सह्या आहेत.

